यशवंत आयुर्वेदिक कॉलेज, कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथे आयुर्वेद पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्र.पीजीए-१००४/२४०८/सीआर-३०८/०४/शिक्षण-२

मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक: १५ एप्रिल, २००६

| | |
|---|---|
| वाचा:-१) | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे पत्र क्र.एसयु/पीजी/ॲफि/१०१०, दिनांक १५ मे, २००४. |
| २) | केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ.नं.आर.१४०११/१२/२००५-ईपी, दिनांक ३१.३.२००६. |

**शासन निर्णय**:-यशवंत आयुर्वेदिक कॉलेज, कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथे खालील तीन विषयातील आयुर्वेद पदव्युत्तर अभ्यासक्रम त्यापुढे दर्शविलेल्या प्रवेश क्षमतेसह परिच्छेद-२ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून, सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास शासन याद्वारे मंजुरी देत आहे.

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता प्रतिवर्ष |
|---|---|---|
| १) | रोगनिदान | दोन |
| २) | शालाक्यतंत्र | दोन |
| ३) | अगदतंत्र | दोन |

२. अटी:-

१) उक्त पदव्युत्तर अभ्यासक्रमास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संलग्निकरण प्राप्त करुन घेण्यात यावे व तदनंतर प्रवेश करण्यात यावेत.

२) राज्य शासन/केंद्र शासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या जागा भरण्यासाठी कार्यपद्धत अवलंबण्यात यावी.

३) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या पत्र क्र.एफ.नं.आर.१४०११/१२/२००५-ईपी, दिनांक ३१.३.२००६. मध्ये विहित केलेल्या अथवा त्यांच्याकडून अथवा राज्य शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

३. सदर आदेश, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या शिफारशीवरुन शासनाने दिनांक २ फेब्रुवारी, २००५ रोजी दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राला अनुसरुन केंद्र शासनाने दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

Copy to
1) Hon Secretary
2) PG file
3) Principal file
4) GR file

YASHWANT AYURVEDIC COLLEGE, KODOLI.
INWARD OUTWARD NO 510
FILE NO
DATE 24/4/06

अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(सु.ना.रणखांबे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई.
प्राचार्य, यशवंत आयुर्वेदिक कॉलेज, कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
अधिष्ठाता, सर्व शासकीय आयुर्वेद महाविद्यालये
मा.मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
अवर सचिव (शिक्षण-१) वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (शिक्षण-२)